शिक्षणक्षेत्रातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व
**मा. प्रा. डॉ. शिवाजीराव कदम**
सहकार्यवाह भारती विद्यापीठ
यांना आदरपूर्वक अर्पण



# देशभक्त शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा

१९५१ सालची गोष्ट. भारतीय विज्ञान परिषदेचे अधिवेशन बंगलोर येथे भरलेले होते. संपूर्ण भारत देशातूनच नव्हे, तर जगातील प्रगत राष्ट्रांतील थोर थोर शास्त्रज्ञ या अधिवेशनासाठी हजर होते. अत्यंत विद्वान आणि थोर मंडळी शिवाय हजारोच्या संख्येने शिक्षक, विद्यार्थी या अधिवेशनाला हजर होते. या अधिवेशनाचे उद्घाटन भारत देशाचे लाडके पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले. पंडितजींचे भाषण देशाची प्रगती आणि थोर परंपरा सांगणारे झाले.

त्यानंतर या अधिवेशनाचे अध्यक्ष भारत देशातील अत्यंत बुद्धिमान आणि देशावर जीवापाड प्रेम करणारे शास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा हे बोलायला उभे राहिले. डॉ. भाभा काय बोलताहेत हे ऐकण्यासाठी जगातील सर्व शास्त्रज्ञांचे मन आतुर झाले. डॉ. भाभा म्हणाले, 'भारत हा विशाल